

जडणघडण निसर्गाशी:
एन्टनी गाउदी चे जीवन



लेखनः रेचल रॉड्रीगस, चित्रः जूली पार्सकिस
भाषान्तरः जुई

अँटनी गाउदी हा स्पेनच्या छोट्या गावात राहत होता. ते गाव कॅटलिनीया प्रदेशात होते. उंच उंच पर्वत शिखरे, रुपेरी ऑलिव्हची झाडे आणि खळखळणारा समुद्र असे निसर्गरम्य ते गाव होते.
या निसर्गरम्य सुंदरतेची छाप छोट्या मुलाच्या मनावर कोरली गेली. हा जणू निसर्गाचा ग्रंथ आहे आणि तो मी आयुष्यभर वाचणार आहे असा विचार तो मुलगा करत असे.
गाउदी वास्तु विशारद बनला. इमारती बनवण्यासाठी लागणाऱ्या आकार व संरचना यांच्या नियमांचा त्यानी अभ्यास केला. परंतु त्याला निसर्गाचे रंग व आकार नेहमीच प्रेरित करत आणि ते
त्याने बनवलेल्या इमारतींमध्ये समाविष्ट केले. भिंतींवर
चढणारी पाने,
इमारतींचे खांब अजस्त्र प्राण्याच्या पायासारखे किंवा खेळाच्या मैदानाभोवती लांबलचक सापाच्या आकाराचे बाक!

एन्टनी गाउदी ने निसर्गाला कलेमध्ये बदलले आणि हे करताना त्यांनी वास्तुशिल्पाच्या दुनियेत मोठी क्रांती घडवली.



जडणघडण निसर्गाशी : एन्टनी गाउदी चे जीवन

लेखनः रेचल रॉड्रीगस, चित्रः जूली पार्सकिस

भाषान्तरः जुई



पापी आणि आजी साठी
- आर. आर.



रेचल शेड साठी,

- जे. पी.



स्पेन मधील एका छोट्याशा गावात एन्टनी गाउदी नावाचा एक छोटा मुलगा राहत होता. त्याच्यासाठी कॅटलोनिया प्रदेश त्याचे जग होते. आकाशाचा छेदणारी पर्वत शिखरे, वाऱ्यावर डोलणारी रुपेरी ऑलिव्हची झाडे आणि चमचमणारा निळा समुद्र.





छोटा गाउदी बरेचदा आजारी असायचा.
त्याची हाडे व सांधे दुखायचे.
आपल्या बहिण आणि भावाबरोबर तो नेहमी धावू किंवा खेळू शकायचा नाही.

पण गोष्टींचे बारीक निरीक्षण करण्यासाठी गाउदीकडे खूप वेळ असायचा.
डोळे विस्फारून जगाकडे बघत असे.
त्याला त्याच्या सभोवताली प्रकाश, आकाश व आकार दिसत असत.
त्याला निसर्ग एक मोठ्या पुस्तकासारखा भासे.
त्याला हे पुस्तक आयुष्यभर वाचायचे होते.









गाउदीचे वडील लोहार होते व तांबे आणि आगीबरोबर त्यांचे काम चालायचे.

त्याच्या आईचे कुटुंब ही धातू काम करायचे.

तो वारंवार धातूच्या चपट्या तुकड्यांना पोकळ आकारांमध्ये बदलताना बघायचा.



हळूहळू गाउदीची तब्येत सुधारू लागली.
त्याची दोन मुलांशी मैत्री झाली.

त्यांनी एकत्र एक प्राचीन, खंडहर झालेला मठ शोधून काढला.
गाउदीने त्या खंडहराची दुरुस्ती करण्याचे स्वप्न पाहिले.




हायस्कूल पूर्ण केल्यावर वास्तु विशारद बनण्यासाठी गाउदी बार्सिलोनाला गेला.
तिथे त्याने महत्त्वपूर्ण स्मारकांचा अभ्यास केला.
ग्रंथालयात जाऊन वाचन केले.
इतर अनेक वास्तु विशारदांनी त्याला शिकवले.

तेव्हा गाउदी सुंदर टोप्या व कोट घालायचा.
तो ऑपेराला व चर्च मध्येही जायचा.
त्याने स्वतःचे टेबल डिझाईन केले.
शहरातले दिव्याचे खांब बनवले.



लवकरच इतर लोक गाउदीकडे आमच्यासाठीही काहीतरी बनव अशी मागणी करू लागले.

गाउदीचा पहिला मोठा प्रकल्प म्हणजे व्हीसेन्स हाऊस.



तिथे फरशांवर सर्वत्र झिनीयाची फुले बहरली होती.
घरावर रंगांची उधळण होती.
घरासमोरून जाणारे लोक आवर्जून थांबून बघायचे.
गाउदीच्या भडक रंगांची त्यांना सवय नव्हती.

गाउदी निसर्गाला घराच्या आत आणत असे.



भिंतीवर पानांचे वेल चढायचे.
वरून लटकणाऱ्या चेरी दिसायच्या.
घिरट्या घालणारे आकाशात उडणारे पक्षी
दिसायचे.



गाउदी एकावेळी अनेक प्रकल्पांवर काम करायचा.
होली फॅमिली चर्चचे डिझाईन करायला त्यानी सुरुवात केली होती.
अनेक वर्ष त्यानी त्याचे स्वप्न पाहिले आणि शेवटी ते साकारले .
त्याची श्रद्धा त्याच्या कामाची प्रेरणा बनली.


गाउदी वास्तू निर्माण करायच्या कामाबाबत अतिशय गंभीर होता. सर्व गोष्टींचा योग्य वापर झाला पाहिजे असा आग्रहही होता.

परंतु स्वतःची कल्पनाशक्ती वापरायला तो डगमगायचा नाही.




पाहुण्यांनी दरवाजा वाजवला तर खाली असलेल्या एका किड्यावर पाय दिल्याशिवाय तो वाजणार नाही.


दरवाजाच्या पलीकडे कोण आलंय हे बघण्याचे भोक हे मधमाशीच्या पोळ्यासारखे दिसणारे.



गाउदीने छोट्यात छोटी तयार केलेली गोष्ट लोकांची नजर हेरून घेते.



आपल्या ग्वेल नावाच्या मित्राच्या गावातल्या घराचा दरवाजा त्यांनी डिझाईन केला.
विटा आणि फरशांच्या आकारांवर एक ड्रॅगन बसलाय.
आपले तीक्ष्ण दात व लपलपणारी जीभ दाखवत.
दिवसेंदिवस गाउदीच्या रचना धाडसी बनत गेल्या.



ग्वेल च्या शहरातील घरात गाउदी ने तळघरातील तबेल्यापर्यंत जाणारा एक वळणदार उतार बनवला.
घोडे त्यावरूनच ये-जा करतात.
वरच्या मजल्यावर सूर्यप्रकाश घुमट असलेल्या छता मधून डोकावतो.
सारे कुटुंब तारांकित आकाशाखाली दिवाणखान्यात बसून गप्पांचा आनंद घेत .




जमिनीखाली प्रार्थना घर कसे बांधता येईल?
गाउदीला हा प्रश्न दहा वर्ष सतावत होता.
शेवटी त्यांनी एक उलटे मॉडेल तयार केले जे
वटवाघुळांच्या वसाहतीसारखे दिसत होते






गाउदी ने कमानी आणि स्तंभांचा उपयोग काय याचा अभ्यास केला.
कलोनिया स्क्रिप्ट बनवताना त्यांची उजवी बाजू वर करून त्याचे बांधकाम केले.



कासा बटालो (बटालो भवन) मध्ये खोलीतली शेकोटी करायची जागा एका मशरूमनी झाकली गेली आहे. तर ये-जा करायचा रस्ता समुद्र तळाशी असलेल्या गुहांप्रमाणे भासतो.



छताच्या कमानी ड्रॅगनच्या मणक्यांप्रमाणे भासतात. खांब अजस्त्र पशुच्या पायांप्रमाणे तर वरांडा त्यांच्या हाडांपासून बनवल्या सारखा भासतो.



गोलाकार भिंती चमकणाऱ्या सापाच्या कातीसारखी वाटतात तर बुरुज जणू काही एक उपसलेली तलवार प्राण्याला ठार करत आहे असा दिसतो.

गाउदीच्या या अजब, विचित्र कल्पनाशक्तीने लोक अचंबित व्हायचे.
अर्थातच प्रत्येकाला या विचित्र इमारती आवडायच्या नाहीत.
परंतु गाउदी या सर्व कुजबुजीकडे दुर्लक्ष करून स्वतःला जे योग्य वाटायचं तेच करायचा.






कासा मिला मध्ये लाटा वाहताना वाटायच्या.
गोलाकार खोल्या मधमाशीच्या विशाल पोळ्याप्रमाणे दिसायच्या.
गाउदी निसर्गाचे कलेत सहजपणे रूपांतर करत होता.

छतावरची चिमणी अशी सजवली जणू काही ती एक चमत्कारांची दुनियाच आहे.
घराची गच्ची एका जहाजाप्रमाणे दिसतो.
येणाऱ्या पाहुण्यांना आपल्या पायाच्या खाली समुद्राच्या लाटाच आहेत असा भास होतो.





कासा मिलाच्या या रूपाकडे बघून बराच गोंधळ उडाला.

काही लोकांना तर त्याची घृणा वाटली.

“हे काय बनवलं आहे?” असे काही लोक विचारत.

“एक पर्वत”, असा काही लोक कयास बांधायचे.

“ किंवा गांधीलमाशीचं पोळं ”.

कदाचित हा रेतीचा बनवलेला मोठा महाल आहे किंवा एक मोठा केक आहे..

काही लोक म्हणायचे गाउदीने बनवलेले हे घर जणू काही आजूबाजूच्या इतर घरांवर हसत आहे.

काही असले तरी कासा मीला ने सगळ्यांना आकर्षित मात्र केले.


डोंगराच्या पायथ्याशी बांधलेले पार्क ग्वेल हे जणू काही एका काल्पनिक दुनियेतले आहे असे वाटते.
चौकीदाराची खोली पाहुण्यांसमोर वाकून त्यांचे स्वागत करत आहे असे वाटते.
मोसाईक ने बनवलेला सरडा चौकीदार आहे असे वाटते.



खेळाच्या मैदानाभोवती असलेले लाकडीबाग सापाच्या नागमोडी वळणाप्रमाणे आहेत.
गाउदीचे कामगार जुन्या फरशा, काचेचे पेले किंवा ताटांचे तुकडे करायचे.
त्यांचा वापर करूनच हे वळणदार बाग त्यांनी सजवले.
गाउदी आपल्या कलाकार कामगारांचे नेहमीच कौतुक करायचा.



गाउदीच्या कैटेलोनिया ची परिकल्पना
साजरी करण्यासाठी अनेक लोक येत.




जसे वय वाढत गेले तसे गाउदी
आपले काम फैमिली चर्चमध्ये करत राहिले.
आपल्या आतापर्यंतच्या इतर कामांमधून शिकून,
आयुष्याची शेवटची वर्षे त्यांनी ही इमारत
बनवण्यासाठी खर्ची केली.

त्याच्या उंच स्तंभांवर फरशा आणि वैनेशियन काचेचे
तुकडे जडवले होते.
चर्च मधला प्रकाश दगडांच्या जंगलांमधून वाट
काढत आत येत होता.

गाउदीचे हे चर्च बार्सिलोना मध्ये स्वप्नवत वाटावे असे
चमकत होते.





आपल्या पश्चात गाउदी ने फार कमी लिखाण व कामाचे नकाशे ठेवले आहेत.
त्याची धाडसी निर्मिती हीच त्याच्या सर्जनशीलतेचि साक्ष आहे.
या निर्मिती एक गोष्ट सांगतात.
जणू जगासाठी गाउदी ने लिहिलेल्या या एक प्रकारच्या कविताच आहेत.

गाउदीच्या इमारती या गोलाकार आणि वळणदार आहेत.
त्या चमचमणाऱ्या आहेत.
जणू काही त्यांना आनंदाच्या उकळ्याच फुटत आहेत.



तुम्ही तुमच्या डोळ्यांनी त्यांचा आनंद घ्यावा याची त्या वाट बघत आहेत.

लेखकाची नोंद

एन्टनी गाउदी ई कॉरनेट चा जन्म दक्षिण कैटेलोनिया, स्पेन येथे 25 जून 1852 रोजी झाला. तीन भावंडात ते सर्वात लहान. त्यांना लहानपणी संधिवात झाला होता. कला आणि वास्तुकला याची आवड त्यांना तरुणपणी लागली. ते बार्सिलोना च्या कॉलेजमध्ये शिकायला गेले आणि नामवंत स्थापत्यकारां च्या हाताखाली त्याने काम करून खूप काही शिकले. कैटेलोनियाच्या भागातील अनेकांना आपल्या संस्कृतीचा अभिमान आहे आणि त्यांना आपण इतर स्पेनच्या पेक्षा वेगळे आहोत असे वाटते. असाच अभिमान गाउदी पण होता आणि अनेक शनिवार रविवार एका क्लब बरोबर ते कैटेलोनिया च्या ऐतिहासिक ठिकाणी जात.

गाउदीच्या सुरुवातीच्या प्रकल्पांनी लवकरच गोथिक शैलीतील सरळ रेषा व मर्यादित समिती नाकारली. त्यांचा टाईलचा वापर, कमानी, राडा रोडयाचा ढिगारा आणि हिरवळीचा वापर म्यूदेहार (म्यूर आणि ख्रिश्चन स्थापत्यशैलीचे मिश्रण) शैली चा प्रभाव प्रतिबिंबित करते. गाउदी ने एक आधुनिक शैली स्वीकारली जी त्यांच्या फिरत्या आणि वक्र रेषांसाठी ओळखली जाते. या आधुनिक शैलीला आर्ट नोवू असे संबोधले जाते. त्यांच्या या वक्र रेषा शैलीला एका फ्रेंच समीक्षकाने 'वर्मिसैली इन डेलिरियम' असे म्हणले आहे.

गाउदी आपल्याबरोबर काम करणाऱ्या प्रतिभावान कामगारांना महत्त्व देत असत. आपल्या काळाच्या बऱ्याच आधी त्यांनी गोष्टींचा पुनर्वापर करणे अवलंबले. ते आणि त्यांचे कामगार मोसाइक साठी जुने कप, दारूच्या बाटल्या आणि ताटे तोडून त्या तुकड्यांचा वापर करत. पार्क ग्वेल च्या मोसाइकमध्ये हे प्रतीत झाले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती वाढत असताना त्यांना न्यूयॉर्क शहरातील गगनचुंबी हॉटेल बनवण्यासाठी लागणाऱ्या नकाशांच्या निर्मितीसाठी आमंत्रित केले गेले. दुर्दैवाने त्या अद्भुत कलाकृती प्रत्यक्षात साकार झाल्या नाहीत. गाउदीच्या अचंबित करणाऱ्या व आधुनिक कामामुळे अनेकदा वाद निर्माण झाले- त्यांच्या साहसी उपक्रमांमुळे व पठडीतल्या मान्यतांना छेद दिल्यामुळे त्यांच्या कामाचा अर्थ शोधण्यासाठी अनेकदा वादविवाद निर्माण झाले. 'ला सगरादा फामीलिया' (होली फैमिली) बद्दल आजही लोकांना कुतूहल आहे. ते पूर्ण करावे की गाउदीच्या सन्मानार्थ आहे तसेच राहू द्यावे याबद्दल प्रश्न आहेत.

वयाच्या 74 व्या वर्षी, 1926 साली सगरादा फमीलिया च्या जवळ एका ट्राम ने त्यांना धडक दिली. त्यानंतर काही दिवसातच त्यांचे निधन झाले. हजारो लोक एका प्रतिभावान, स्थानिक आणि लोकनायक असलेल्या माणसाच्या अंतिम यात्रेत सहभागी झाले. निसर्ग आणि स्वतःच्या कॅथलिक श्रद्धेतून प्रेरणा घेऊन गाउदी ने बांधकामाची नवीन भाषा तयार केली.

आज, गाउदीच्या सात इमारती युनेस्को च्या वास्तुकला आणि इमारत तंत्रज्ञानाच्या विकासात सर्जनशील योगदानासाठी जागतिक वारसा स्थळे आहेत. त्या सात इमारती - कासा विसेन्स (1883-1888); पलासियो ग्वेल (1885-1890); कोलोनिया ग्वेल क्रिप्ट (1898-1916); कासा बतालो (1904-1906); कासा मीला (1906-1910); पार्क ग्वेल (1900-1914); आणि ला सरगादा फामीलिया नेटिविटी फसाड तथा क्रिप्ट (1883-1926) या होय. या पुस्तकात उल्लेख केलेल्या इतर रचनांमध्ये बार्सिलोना शहराच्या प्लाका रियाल (1878-1880) येथील दिव्याचे खांब; कासा कॅल्वेट वाय पिंटो (1898-1900),ज्यामध्ये किडा मारण्यासाठी दरवाजा ठोठावणारा यंत्र आहे; आणि फिन्का गुएल येथील ड्रॅगन गेट (1882-1887) यांचा समावेश आहे.अनेकांसाठी, गाउदीच्या कृती बार्सिलोनाच्या आत्माचे आणि कॅटलोनियन संस्कृती आणि वारशाच्या अभिमानाचे प्रतिक आहेत. दरवर्षी, अगणित प्रवासी गाउदीच्या असीम कल्पनाशक्ती आणि धाडसी मौलिकतेला श्रद्धांजली वाहतात.

